FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154201

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: दिं. प्र. वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No: 83, वर्ष Year: 2023, दिनांक Date: २८/१०/२०२३

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८, कलमे Sections: ७, १२
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना Occurrence of offence: वार Day: सोमवार, तारीख पासून Date from: ६/८/२०२३, वेळ Time ......, तारीख पर्यंत Date to: २६/१०/२०२३, वेळ Time: १७.३१ वा
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: २८/०८/२०२३, वेळ Time: १६.३० ते दरम्यान
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference: Entry No. 03/2023, तारीख Date: २८/१०/२०२३, वेळ Time: ०५.२० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence: (a) Direction and distance from P. S. ...... Chouki / Beat / O.P. Name and No. ......
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: श्रीमती साई किराणा दुकान, ठिकाणाचे नंबर No. if any ......, गल्ली Ward: जनकल्याण नगर, मालाड (प), मुंबई, रस्त्याचे नाव Name of road ......
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: अरविंदसिंह जाडेजा
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: जडेजा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ६२ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 9869755666
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ......, (f) व्यवसाय Occupation: व्यापार
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address: आदित्य सोसायटी, गल्ली / सर्व्हे नं. Ward: स्मार्ट, घर / नाव नं. House/Name No.: २९ ए/३२, सेक्टर-९, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ......, पॅन नं. PAN No. ......, वोटर्स नं. Card No. ......
   रस्त्याचे नाव Road: चारकोप, कांदिवली, मुंबई, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......
   तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

१) लोकसेवक श्री. रणजितसिंह जाडेजा पवार, वय ५७ वर्षे, धंदा: नोकरी (पद: अन्न सुरक्षा अधिकारी, कार्यालय- अन्न व औषध प्रशासन (म.रा.) वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रा (पू) मुंबई ५१. रा. ठि. ८/१३७८, दुसरा माळा, एम. एम. आर. डी. ए. नगर, जामश्री हॉटेलच्या मागे, वांद्रा (पू) मुंबई



२) खाजगी इसम श्री. अभिषेक नारायण रिकेकर, वय ३२ वर्षे, रा. ठि. २०/६०८, गुलमोहर सोसायटी, रॉक पॉवर हाऊस, म्हाडा, लाल डोंगर, बोरीवली (प) मुंबई ९२

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी श्री. अरविंदसिंह जडुभा जाडेजा, वय ६२ वर्षे धंदा - व्यापार, रा. द्वि. अथिव सोसायटी, फ्लॅट नं. ९०८, रुम नं. १२, सेक्टर - १, चारकोप, कांदिवली (प), मुंबई. मो. नं. ९८६९८०४४६६६ यांचा सविस्तर फिर्यादी जबाब हा स्वतंत्र पानावर संगणीकृत करण्यात आला असून, तोच गुन्ह्याचा प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(हणमंत श्यामा क्षिरसागर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

[illegible]
27/10/2021

फिर्याद दिनांक — २६/१०/२०२१.

मी अरविंदसिंह नटुभा जाडेजा, वय ६२ वर्षे, धंदा–किरणा दुकान, रा.ठी. आशिष सोसायटी, प्लॉट नं. १८९, रुम नं.१२, सेक्टर–०१, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०० ०६७, मो.क्र. ९८६९७४४६६६.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कटुंबियांसह गेल्या २० वर्षापासुन राहतो. माझे जनकल्याणनगर, मालाड पुर्व, मुंबई येथे भुमी मार्ट नावाचे किराणा दुकान सन–२०१७ सालापासुन चालवितो.

दिनांक ०६/०९/२०२१ रोजी रणजित पवार, फुड सेप्टी ऑफिसर, बांद्रा हे त्यांचे असिस्टंट यास सोबत घेवून माझे वरील नमुद दुकानावर आले. त्यावेळी त्यांनी माझेकडे दुकानाचे फुड लायसन्स बाबत विचारणा करुन माझे किराणा दुकानातील बेसन, मैदा व तुरडाळ यांचे सॅम्पल घेवून मला नोटीस देवून दुकानावर कारवाई करणार असल्याचे सागितले, त्यावेळी मी त्यांना विनंती केली असता रणजित पवार यांनी माझेकडे दुकानावर कारवाई न करण्यासाठी रु. ५०,०००/– लाचेची मागणी करुन त्यांचे बांद्रा येथील कार्यालयात भेटावयास बोलाविले.

परंतु माझे महत्वाचे कामानिमित्त मी माझे मुळगांव कच्छ, गुजरात येथे गेलो होतो. मला लोकसेवक रणजित पवार यास लाच दयावयाची इच्छा नसल्याने मी दि. २८/०९/२०२१ रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयात येवुन लोकसेवक रणजित पवार यांचे विरुध्द लेखी तक्रार अर्ज दिला. त्यानंतर पो. नि. क्षिरसागर यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती सांगुन सदरची कारवाई दि. २९/०९/२०२१ रोजी करण्यात येणार असल्याचे सांगितले..

दि. २९/०९/२०२१ रोजी सकाळी ०९.०० वाजता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पो.नि. क्षिरसागर यांनी पोलीस पथकातील स.पो.आ. आबासाहेब पाटील, व दोन सरकारी पंच व पोलीस पथकाची माझेशी ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. क्षिरसागर हे मला व दोन सरकारी पंचाना घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. क्षिरसागर व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांचे सुचनेप्रमाणे लोकसेवक हे त्यांचे कार्यालयात उपस्थीत आहेत अगर कसे ? याबाबत खात्री करण्याकरीता माझे मित्र श्री. खोडीलाल पटेल, यांचे मोबाईलवरुन लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी, 'फुड अॅन्ड ड्रग ऑफिस , रिझर्व्ह बॅकेच्या समोर, कलानगर येथील कार्यालयात सकाळी ११.०० वा. पुर्वी येवून भेटु शकता असे सांगितले'. नमुद मोबाईलवरील संभाषण पो.नि. क्षिरसागर यांनी दोन पंचासमक्ष डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर पो.नि. क्षिरसागर, स.पो.आ. पाटील दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह दोन शासकीय व एक खाजगी वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाचे दिशेने गेलो. लोकसेवकाचे कार्यालयाचे काही अंतरावर गेल्यावर पो.नि. क्षिरसागर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे शर्टाच्या आतील बाजुस बनियनला लावला व मी, माझा मित्र खोडीलाल पटेल व पंच श्री. डुबल असे लोकसेवकास भेटण्यास त्याचे कार्यालयात गेलो. तेथे तळमजल्यावरील मोकळया जागेत लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार हे मला भेटले त्यावेळेस मी माझी

Scanned with OKEN Scanner

त्यांना ओळख करुन देवून माझे मालाड येथील भुमी मार्ट या किराणा दुकाना संदर्भात दिलेल्या नोटीस बाबत विचारणा केली असता त्यांनी माझे दुकानाचे बाहेर लावण्यात आलेल्या स्टॉलचे लायसन्स काढण्याच्या सुचना देवून फोन करुन दुकानात भेट देणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, पो.नि. क्षिरसागर व पथक यांच्याजवळ आलो असता त्यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे, माझे मित्र खोडीलाल पटेल व लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. क्षिरसागर यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दि. ०५/१०/२०२१ रोजी सायंकाळी ०६.५८ वा. लोकसेवक श्री.रणजितसिंह पवार यांचे सोबत माझे दुकानावर दि. ०६/०९/२०२१ रोजी आलेला त्यांचा सहकारी अभिषेक याने त्याचा मोबाईल क्र. ९८१९६७८८९२ वरुन माझे मोबाईल क्र. ९८६९७४४६६६ वर फोन करुन दि. ०६/१०/२०२१ रोजी श्री. रणजितसिंह पवार यांचेसह माझे भुमी मार्ट दुकानावर येणार असल्याबाबत सांगितले. सदरची हकीगत हि मी पो. नि. क्षिरसागर यांना सांगुन त्यांचे सुचनेप्रमाणे दि. ०६/१०/२०२१ रोजी सकाळी ०८.३० वा. ला.प्र.वि. कार्यालय येथे हजर झालो. त्यानंतर मी व पडताळणी पथक असे मालाड येथे रवाना झालो. सदर ठिकाणी दोन सरकारी पंच यांना सोबत घेवून भुमी मार्ट दुकाना जवळ असलेल्या माझे मित्र खोडीलाल पटेल यांचे निवासस्थान परीसरात थांबुन राहीलो. परंतु सायंकाळी ०६.०० वाजेपावेतो लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार व त्यांचा सहकारी अभिषेक हे माझे दुकानावर न आल्याने पो.नि. क्षिरसागर यांचे सुचनेनुसार मी अभिषेक यांचे मोबाईल फोनवर फोन करुन दुकानावर येण्याबाबत विचारले असता त्यांने, 'ठिक है थोडा टाईम देना मै उनसे बोलके बोलता हूँ आपको, आज तो पॉसिबल नही, दो–चार दिन रुकना थोडा, मै तुमको सामनेसे फोन करता हूँ' असे बोलले सदरचे संभाषण हे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आले आहे. त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांचे सुचनेनंतर सदरची कारवाई स्थगीत करण्यात आली.

त्यानंतर दि. २५/१०/२०२१ रोजी सायंकाळी १८.२० वा. चे दरम्यान लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार यांचे सहकारी अभिषेक यांने माझे मोबाईलवर फोन करुन दि. २६/१०/२०२१ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेनंतर ते व लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार असे माझे भुमी मार्ट दुकानावर येणार असल्याचे सागितले. सदरची हकीगत मी पो.नि. क्षिरसागर यांना फोनद्वारे कळविली.

पो.नि. क्षिरसागर यांच्या सुचनेप्रमाणे मी दि. २६/१०/२०२१ रोजी सायंकाळी ०४.०० वा. माझे मित्र खोडीलाल पटेल यांचे निवासस्थान राजशिवगंगा बिल्डींग, मार्वे रोड, मालाड पश्चिम येथे हजर झालो. सदर ठिकाणी पो.नि. क्षिरसागर, स.पो.आ. आबासाहेब पाटील, दोन सरकारी पंच व कारवाई पथकातील कर्मचारी यांचेशी माझी ओळख करुन दिली. त्यानंतर तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. क्षिरसागर व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी मला व पंच क्र. १ डुबल यांना पडताळणी कारवाई बाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी, दोन पंच, सापळा कारवाईतील पो. अधिकारी व कर्मचारी माझे भुमी मार्ट किराणा दुकानाचे आजुबाजुचे परीसरात कोणासही संशय येणार नाही अशा रितीने लोकसेवकाची वाट पहात राहीलो.

समक्ष,

( हणमंत क्षिरसागर),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

27/10/2021

Scanned with OKEN Scanner

काही वेळातच लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार व त्यांचा सहकारी अभिषेक हे माझे भुमी मार्ट दुकानात आल्याचे माझे मित्र खोडीलाल पटेल यांनी मला कळविले. त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी तात्काळ त्यांचेजवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टाचे आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच क्र. १ डुबल असे लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार व त्यांचा सहकारी अभिषेक हे माझे भुमी मार्ट दुकानाचे काऊटर जवळ बसले होते तेथे जावुन मी व माझे मित्र खोडीलाल पटेल असे मिळुन त्यांची भेट घेवून मला दिलेल्या दुकानाचे नोटीस संदर्भात चर्चा केली असता लोकसेवक श्री. पवार यांनी, 'बाहर जो काऊंटर है ना उसका बीस पचीस हजार फाईन आयेगा, केस तो बनेगा, नही तो उसको तो देना पडेगा ना फिप्टी पर्सेंट, ओ भी खुला दिल से बोला जो है ओ है सॅम्पलका ओ, अभी छे महीने क्या २५–२५ करो' तसेच खाजगी इसम अभिषेक याने, 'अंडरस्टॅडींग करके लेते है, तुम्हारे बोलनेपर मै सर को लेके आया, फाय झिरो कर दो, छे–छे महीनेका जो भी रेक्युलुर रहेगा ओ फिक्स करदो, पॉच कम कर दो फोर फाय करदो चलो दे दो' असे बोलले. त्यानंतर मी व पंच क्र. १ डुबल असे पो.नि. क्षिरसागर थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी माझे बनियनला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करुन मी, माझे मित्र खोडीलाल पटेल, लोकसेवक रणजितसिंह पवार व त्यांचा सहकारी अभिषेक यांच्यात झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामधील संभाषण ऐकले. पडताळणी दरम्यान लोकसेवक रणजितसिंह पवार व त्यांचा सहकारी अभिषेक यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट निष्पन्न झाल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे पो.नि. क्षिरसागर यांनी सागुन, त्याप्रमाणे मला, दोन पंच व सापळा कारवाईतील पोलीस पथक यांना सापळापुर्व/सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर लोकसेवक रणजितसिंह पवार व त्याचा सहकारी अभिषेक यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम रु. ४०,०००/– ( रु. ५००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या ८० नोटा ) मी माझ्याकडील स्वत:चे बचतीतील लाचेची रक्कम पो.नि. क्षिरसागर यांचेकडे दिली. पो.नि क्षिरसागर यांनी लोकसेवक रणजितसिंह पवार अथवा त्यांचा सहकारी अभिषेक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा डावा हात चेहऱ्यावरुन वारंवार फिरवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांनी मला तसेच पंचांना लाचेच्या रक्कमेस लावण्यात येणाऱ्या अॅन्थ्रेसिन पावडर बाबतचे गुणधर्म समजावुन सांगितले त्यानंतर पो.नि. क्षिरसागर यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोलीस अंमलदार वाहन चालक पो.ना.चा.क्र.९८०८१५/श्री. चिंचोळकर यांनी माझे दुकानाचे गोडावुन मध्ये पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अॅथ्रासीन पावडर लावली व माझे पॅन्टचे उजव्या बाजुस असलेल्या खिशात अलगद ठेवली व ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.१ डुबल असे माझे भुमी मार्ट दुकानात लोकसेवक बसलेल्या ठिकाणी जावुन भेटलो असता त्यावेळी खाजगी इसम अभिषेक हा बोलला की, 'हा यहाँ ऐसा मत दो रखों, आत ठेवा ना त्याच्या, ऐसे चार लोग देखते है बराबर लगता है क्या, कव्हर डालके' असे बोलुन अभिषेक याने सोबत आणलेल्या लॅपटॉपच्या बॅगेची बाहेरील बाजुची चैन उघडुन त्यामध्ये मला पैसे ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशातील लाचेची रक्कम रु. ४०,०००/– बाहेर काढुन लॅपटॉपच्या बॅगेत ठेवली. त्यानंतर मी दुकानाचे बाहेर येवून सापळा कारवाईतील पथकास पुर्व नियोजित इशारा केला.

Scanned with OKEN Scanner

त्यावेळी सापळा पथकातील पो.अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ लोकसेवक रणजितसिंह पवार व त्यांचा सहकारी अभिषेक यास लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. लोकसेवक श्री. रणजितसिंह पवार व त्यांचा सहकारी खाजगी इसम अभिषेक टिळेकर यांनी माझे दुकानावर कारवाई न करण्यासाठी माझेकडे रूपये ५०,०००/– लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ४०,०००/– लाचेची रक्कम माझ्याकडुन स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझे, लोकसेवक रणजितसिंह पवार अथवा त्यांचे सहकारी खाजगी इसम अभिषेक टिळेकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचुन दाखवुन हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( हणमंत क्षिरसागर),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

27/10/2021

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ निरंक

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील नमूद आलोसे श्री. रणजितसिंह पवार व खाजगी इसम श्री कृतिक हिलेकर हे दि. ६/४/२०२१ रोजी फिर्यादी यांचे श्री मार्ट किराणा दुकानात गेले व त्यांच्याकडे दुकानातील वजन काटा व मुरडाक यांचे सॅम्पल घेऊन फिर्यादी यांना नोटिस देऊन कारवाई करणार असल्याचे सांगितले, नंतर कारवाई न करण्यासाठी आलोसे यांनी रु. ५०,०००/- लाचेची मागणी केली. दि. २६/१०/२०२१ रोजी नमूद आलोसे व खाजगी इसम यांनी फिर्यादी यांचेकडे दुकानावर कारवाई न करण्यासाठी रु. ५०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडी अंती रु. ४०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून नमूद आलोसे यांच्या सांगण्यावरून नमूद खाजगी इसम यांनी लाचेची रक्कम रु. ४०,०००/- स्विकारली

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून भ्र.प्र. अधि. १९८८ कलम ७,१२, प्रमाणे गुन्हा नोंद

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature] 27/10/2021

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name हणमंत सोमा शिरसागर

पदनाम Rank पोलिस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Code No. of I.O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner